महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
(मराठा आरक्षण कक्ष)
४ था माळा, मंत्रालय (विस्तार),
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०००३२.
दूरध्वनी क्र.०२२-२२०२५१७७ Email- vivek.jagadale@gov.in

क्र. बैठक-२०२५ /प्र.क्र.७४/मआक दिनांक:- १५ ऑक्टोबर, २०२६

प्रति,

अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
उच्च व तंत्र शिक्षण विभाग/ वैद्यकीय शिक्षण विभाग/ कृषि विभाग/ पशुसंवर्धन,
दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग

विषय: मराठा समाजाला इतर मागासवर्गीयांप्रमाणे शैक्षणिक सवलती व सोयी-सुविधा यांचा लाभ अनुज्ञेय करण्याबाबतच्या दि. ०५.०६.२०२६ च्या शासन निर्णयाची अंमलबजावणी करणेबाबत तसेच इतर मागास प्रवर्गास असलेल्या शिक्षण शुल्कापेक्षा अधिकचे शिक्षण शुल्क मराठा विद्यार्थ्यांकडून न घेणेबाबत...

संदर्भ :- सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण-२०२५/प्र.क्र.१२९/(ई-१५५८६०६)/आरक्षण-५, दिनांक ०५ जून, २०२६

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भाधीन शासन निर्णयान्वये राज्य शासनाने मराठा समाजातील विद्यार्थ्यांना इतर मागास वर्ग (OBC) प्रवर्गातील विद्यार्थ्यांप्रमाणे सर्व शैक्षणिक सवलती व सोयी-सुविधा चालू शैक्षणिक वर्षापासून (सन २०२६-२७) लागू करण्याचा धोरणात्मक निर्णय घेतला आहे. या निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी संबंधित विभागांनी चालू व आगामी वित्तीय वर्षात आवश्यक त्या निधीची स्वतंत्र तरतूद करणे, तसेच पात्र लाभार्थ्यांना ऑनलाईन पद्धतीने लाभ मिळण्यासाठी महाडीबीटी (MahaDBT) पोर्टलवर आवश्यक ते तांत्रिक बदल करून घेणे बंधनकारक आहे, अशा सूचना देण्यात आलेल्या आहेत.

२. मराठा समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक स्थितीबाबत तसेच इतर संलग्न बाबींवरील शिफारशींवर करावयाच्या कार्यवाहीबाबत गठीत मंत्रिमंडळ उपसमितीची बैठक मा. मंत्री जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) तथा अध्यक्ष, मंत्रिमंडळ उपसमिती यांच्या अध्यक्षतेखाली बुधवार, दिनांक १४/१०/२०२६ रोजी दुपारी ०२.०० वा. सह्याद्री अतिथि गृह, मलबार

हिल, मुंबई येथे आयोजित करण्यात आलेली होती. सदर बैठकीत शासन निर्णय दि.०५.०६.२०२६ अन्वये घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी होत नसल्याचे तसेच शैक्षणिक संस्था/ महाविद्यालय मराठा विद्यार्थ्यांकडून संपूर्ण शिक्षण शुल्क भरून घेत असल्याची बाब मा. मंत्रिमंडळ उपसमितीच्या निदर्शनास आणून दिलेली आहे.

३. त्यानुसार मा. मंत्रिमंडळ उपसमितीने दिलेल्या निर्देशानुसार, शासन निर्णय दि.०५.०६.२०२६ अन्वये घेतलेल्या निर्णयाची तात्काळ अंमलबजावणी करण्याबाबत तसेच *इतर मागास प्रवर्गास असलेल्या शिक्षण शुल्कापेक्षा अधिकचे शिक्षण शुल्क मराठा विद्यार्थ्यांकडून न घेणेबाबत तसेच सदर शिक्षण शुल्क न भरल्यामुळे प्रवेश प्रक्रियेस कोणत्याही प्रकारचा अडथळा निर्माण होणार नाही याबाबतची दक्षता घेणेबाबत सर्व संबंधित विभागांनी आपल्या अधिनस्त शिक्षण संस्था/ महाविद्यालये यांना आवश्यक त्या सुचना / निर्देश देण्यात यावेत.* तसेच सदर निर्णयाची अंमलबजावणी न करणाऱ्या शिक्षण संस्था/ महाविद्यालये यांच्याविरूध्द नियमानुसार कार्यवाही करण्यात यावी.

४. शासन निर्णयान्वये दिलेल्या सूचनांच्या तसेच मा.मंत्रिमंडळ उपसमितीने दिलेल्या निर्देशानुसार आपल्या विभागाकडून करत असलेल्या / केलेल्या कार्यवाहीचा सद्यःस्थितीदर्शक अहवाल या विभागास तात्काळ सादर करण्यात यावा.

५. मंत्रिमंडळ उपसमितीचे निर्देश विचारात घेवून, कृपया यास सर्वोच्च प्राधान्य देण्यात यावे, ही विनंती.

आपला,

(ललितकुमार घायगुडे )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत-

१. मा. मंत्री, जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे महामंडळ) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
२. मा. सचिव (साविस) यांचे स्वीय सहाय्यक
३. निवडनस्ती-मआक